| वर्ष - 7 | अंक - 269 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- भारताची 'आदर्श' झुंज अपयशी!
- ओम शब्द आणि भगवा रंग
- पाकिस्तानमध्ये मतमोजणी पूर्ण
- योगी आदित्यनाथ यांचा अभ्यास कमी


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 12 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आधी पक्षसंघटन मग मुख्यमंत्री पद'!

## » अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना सुनावले!; बालेवाडी येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा युवा मिशन मेळावा उत्साहात

। पुणे । महाईन्यूज

**युवा पदाधिकारी असताना १९९९ ते २००४ या कालखंडात राज्य पिंजून काढले. त्याचा परिणाम २००४ च्या निवडणुकीत दिसून आला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस सर्वात जास्त जागा जिंकणारा पक्ष ठरला. मात्र त्यानंतरही राष्ट्रवादी काँग्रेसला मुख्यमंत्री पद मिळाले नाही. मुख्यमंत्री पद का मिळाले नाही, याच्या जास्त खोलात मी आत्ता जाणार नाही. मात्र आताही जरा दमाने घ्या. सारखे मुख्यमंत्री, मुख्यमंत्री करू नका, प्रथम पक्ष संघटना मजबूत करा मग मुख्यमंत्री पदाचे पाहू, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना रविवारी सुनावले.**






राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित युवा मिशन या मेळाव्यात अजित पवार यांनी कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. भाजपबरोबर सत्तेत असलो तरी विचारधारा कायम आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडून आलेल्या सर्व आमदारांची बरोबर जाण्याची भूमिका होती. मात्र वरिष्ठांनी ही भावना समजून घेतली नाही, पण ती समजून घेतल्याचे भासविले. पक्षाची फरफट होऊ नये म्हणूनच ठोस भूमिका स्वीकारावी लागली. गेल्या दहा वर्षात त्यांच्याकडून दूरध्वनी केले जात नव्हते. चौकशी केली जात नव्हती.

आता मात्र चौकशी सुरू आहे. त्यामुळे दूरध्वनी आले तरी हळवे होऊ नका, मनाची चलबिचल होऊ देऊ नका. महायुती देईल त्या उमेदवाराला भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन पवार यांनी यावेळी केले.

अजित पवार म्हणाले की, युवा वर्ग सामाजिक आणि राजकीय बदलांचे आधार असतात. जगात जिथे क्रांती झाली ती युवकांच्या बळावर झाली आहे. त्यामुळे नव्या बदलाच्या युगाचा स्वीकार करावा लागणार आहे. आताच्या काळातील राजकारण वेगळे झाले आहे. समाजमाध्यमाला महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र या माध्यमाबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. पक्ष, पक्षाचे नेते, कार्यकर्ते पदाधिकारी बदनाम होतील, अशी कोणतीही कृती करणे चुकीचे आहे. बदनामी होत असेल तर निरोपाची वाट न पहाता त्याचे खंडन करणे अपेक्षित आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने विचारधारा सोडलेली नाही. शिवसेनेबरोबर असतानाही ती कायम होती. भाजबरोबर असतानाही कायम आहे. महाविकास आघाडी आणि त्यानंतर महायुती का केली हे यापूर्वच सांगितले आहे.

### नव्या विचाराने पुढे जा: अजित पवार

» आमदारांना मंत्रीपद मिळाले मात्र आम्हाला काय असे कार्यकर्त्यांना वाटत असेल . स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल आहे. मात्र येत्या दोन महिन्यात लोकसभेची निवडणूक होईल. त्याची आचारसंहिता महिन्याभरात लागेल. त्यामुळे प्रथम महायुतीच्या उमेदवाराला भरघोस मतांनी विजयी करावे लागेल. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रयत्नात कमी पडणार नाहीत, याकडे लक्ष दिले पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अनेक पक्ष प्रवेश होत आहेत. त्यांचे स्वागत करताना आपला मूळचा कार्यकर्ता डावलला जाणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. सत्तेत सहभागी झालो असलो तरी विचारधारा कायम आहे. त्यामुळे चलबिचल होऊन नका, चुकीचे निर्णय घेऊ नका. नव्या विचाराने पुढे जा, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

### राष्ट्रवादी युवक निर्णायक भूमिका बजावेल

» राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचा छत्रपती शिवाजी महाराज बालेवाडी क्रिडा संकूल येथे राज्यस्तरीय युवक मेळावा संपन्न झाला. युवा नेते पार्थ पवार, आमदार सुनील शेळके, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवक मेळाव्यानिमित्त मेळाव्याच्या पूर्वी दुचाकी रॅली काढण्यात आली.

यामध्ये पिंपरी चिंचवडचे युवक शहराध्यक्ष शेखर काटे यांनी देखील सहभाग घैतले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मेळाव्याला सुरुवात करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे आणि मान्यवरांनी या मेळाव्यात मार्गदर्शन केले. आगामी निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेस निर्णायक भूमिका बजावेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# आपल्या कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका!

## शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचे शरद पवार यांना साकडे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष' हे नाव आणि 'पक्ष चिन्ह' अजित पवार गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने दिल्यानंतर संतप्त कार्यकर्त्यांनी पुण्यातील पक्ष कार्यालयातील अजित पवार यांचा नामफलक तोडला होता. तसेच अजित पवार यांच्या विरोधात घोषणाबाजी देखील करण्यात आली होती. त्यानंतर अजित पवार गट आणि शरद पवार गटाचे कार्यकर्ते एकमेकांसमोर आले होते.**

कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका असल्याचा दावा करत वैयक्तिक लक्ष घालावे, असे साकडे खुद्द शरद पवार यांना शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी समक्ष भेट घेत घातले. पुण्यातील शिवाजीनगर येथील निवासस्थानी शरद पवार यांची भेट घेतली.त्यावेळी प्रशांत जगताप यांनी कार्यकर्त्यांसमवेत भेट घेऊन तक्रार केली.राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील आमदार पात्र की अपात्र या संदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी चालू आहे. त्याचा निकाल प्रलंबित असतानाच निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निर्णय मागील आठवड्यात घेण्यात आला. त्यानंतर पुण्यातील शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली पक्ष कार्यालयाबाहेर काळ्या फिती बांधुन निषेध व्यक्त करण्यात आला होता. "गली गली मे शोर है अजित पवार चोर है, जो नाही झाला काकाचा, तो नाही होणार जनतेचा", अशा घोषणा दिल्या. तर पक्ष कार्यालयाबाहेर असलेल्या कोनशिलेवरील अजित पवार यांचे नाव हातोडी मारून फोडण्यात आले.या घटनेनंतर अजित पवार गटाचे शहर उपाध्यक्ष दत्ता सागरे यांनी प्रशांत जगताप यांना जाब विचारला, त्यामुळे काही काळ पक्ष कार्यालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण



झाले होते. त्यामुळे पक्ष कार्यालय परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या सर्व घडामोडीनंतर दोन्ही बाजूने आरोप प्रत्यारोप सुरूच आहे. तर आज शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप हे ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांना सभेच्या ठिकाणी सुखरूप पोहोचवणाऱ्या कार्यकर्त्यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यासाठी शिवाजीनगर येथील निवासस्थानी घेऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी एकूणच सर्व घटनाक्रम सांगितला. त्याचवेळी अजित पवार यांच्या विरोधात आंदोलन झाल्यानंतर एक व्यक्ती मला घरी भेटण्यास आला.ज्यांनी अजितदादांच्या नावाची पाटी फोडली आणि विरोधात घोषणाबाजी केली, त्या आंदोलनकर्त्यांवर हल्ला होऊ शकतो. याबाबत मला त्या व्यक्तीने माहिती दिली. पण या सर्व मुलांनी केलेल्या कृत्याबद्दल माफी देखील मागितली असून दिलगिरी व्यक्त केली आहे. ही सर्व मुले २५ ते २८ वयोगटातील आहे. या सर्वांच्या जिवाला काही होऊ नये. त्यामुळे या प्रकरणी दादांनी लक्ष घालावं आणि दादांनी मोठेपणा दाखवावा, असं गाऱ्हाणं शरद पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी शरद पवार यांच्या समोर मांडलं. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांच्या समस्या देखील त्यांनी जाणून घेतल्या.त्यावेळी प्रशांत जगताप यांनी कार्यकर्त्यांसमवेत भेट घेऊन तक्रार केली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार पात्र की अपात्र या संदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी चालू आहे. त्याचा निकाल प्रलंबित असतानाच निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निर्णय मागील आठवड्यात घेण्यात आला. त्यानंतर पुण्यातील शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली पक्ष कार्यालयाबाहेर काळ्या फिती बांधुन निषेध व्यक्त करण्यात आला होता. "गली गली मे शोर है अजित पवार चोर है, जो नाही झाला काकाचा, तो नाही होणार जनतेचा", अशा घोषणा दिल्या. तर पक्ष कार्यालयाबाहेर असलेल्या कोनशिलेवरील अजित पवार यांचे नाव हातोडी मारून फोडण्यात आले. अजित पवार गटाचे शहर उपाध्यक्ष दत्ता सागरे यांनी प्रशांत जगताप यांना जाब विचारला, त्यामुळे काही काळ पक्ष कार्यालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पक्ष कार्यालय परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### सर्व मुले 25 ते 28 वयोगटातील

» या सर्व घडामोडीनंतर दोन्ही बाजूने आरोप प्रत्यारोप सुरूच आहे. तर आज शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप हे ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांना सभेच्या ठिकाणी सुखरूप पोहोचवणाऱ्या कार्यकर्त्यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यासाठी शिवाजीनगर येथील निवासस्थानी घेऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी एकूणच सर्व घटनाक्रम सांगितला. त्याचवेळी अजित पवार यांच्या विरोधात आंदोलन झाल्यानंतर एक व्यक्ती मला घरी भेटण्यास आला.ज्यांनी अजितदादांच्या नावाची पाटी फोडली आणि विरोधात घोषणाबाजी केली, त्या आंदोलनकर्त्यांवर हल्ला होऊ शकतो. याबाबत मला त्या व्यक्तिने माहिती दिली. पण या सर्व मुलांनी केलेल्या कृत्याबद्दल माफी देखील मागितली असून दिलगिरी व्यक्त केली आहे. ही सर्व मुले २५ ते २८ वयोगटातील आहे.

# पुणेकरांना पुण्येश्वर मंदिर मिळालेच पाहिजे!

## सुनील देवधर यांचा निर्धारः 'नमो पुणे अभिवादन बाईक रॅली' उत्साहात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे राम मंदिर उभे राहू शकले असून, ज्याप्रमाणे देशाला राम मंदिर मिळाले, त्याप्रमाणे पुणेकरांना देखील पुण्येश्वर मंदिर मिळालेच पाहिजे असा निर्धार भाजपचे राष्ट्रीय नेते सुनील देवधर यांनी व्यक्त केला.**

रविवारी, ११ फेब्रुवारी रोजी सुनील देवधर यांच्या नेतृत्वात पुण्यात 'नमो पुणे अभिवादन



बाईक रॅली'चे आयोजन करण्यात आले होते, त्याच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.या बाईक रॅलीत ३ हजारांहून बाईकधारक व ५ हजारांहून अधिक पुणेकर रामभक्त सहभागी झाले होते. त्यात महिला व युवतींची लक्षणीय संख्या होती. पुण्यातील नागरी समस्यांचे निराकरण, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आम्ही संकल्पबद्ध असून, पुण्याला आंतरराष्ट्रीय दर्जाचे विकसित शहर बनवण्यासाठी आपण सर्वांनी संकल्प व शपथ घेवूया असे, सुनील देवधर यांनी याप्रसंगी बोलताना केले. त्याचप्रमाणे देशाला भव्य राम मंदिर दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे त्यांनी आभार देखील व्यक्त केले. भाजप कार्यालय, कृष्णसुंदर गार्डन, डीपी रोड, एरंडवणे येथून या रॅलीला सुरुवात झाली. याप्रसंगी भाजपचे युवा नेते कुणाल टिळक, राजे शिवराय प्रतिष्ठानचे अध्यक्ष व भाजप शहर चिटणीस महेश पवळे आणि दिनेश होले यांच्यासह हजारोंच्या संख्येने पुणेकरांनी बाईक रॅलीत सहभाग घेतला. डी पी रोडवरून रॅली म्हात्रे पूल – शास्त्री रोड- माधवराव पेशवे रोड – बाजीराव रोड – शनिवार वाडा – मॉडर्न कॅफे – जंगली महाराज रोड – एफ. सी. रोड – ज्ञानेश्वर पादुका चौक मार्गे मॉडर्न इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या ठिकाणी येऊन सांगता झाली. यावेळी रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांनी राम खिचडीचा देखील आस्वाद घेतला.

### रॅली'साठी लक्षणीय प्रतिसाद...

» 'नमो पुणे अभिवादन बाईक रॅली'साठी पुणेकरांनी लक्षणीय प्रतिसाद दिला, ज्यामाध्यमातून देशाला राम मंदिर दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानण्यात आले. सर्व पुणेकरांनी यावेळी नरेंद्र मोदी यांना धन्यवाद दिले. यावेळी समृद्ध पुणे, विकसित भारत अशा घोषणा देत ही भव्य बाईक रॅली उत्साहात पार पडली.

# देहू, आळंदी, चाकण व राजगुरुनगरसाठी आता स्वतंत्र महापालिकेचा विचार सुरु!

## 'तुम्हाला अडविणारे आता कोणी नाही, त्यामुळे कारणे नकोत; अजित पवार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवारांनी रविवारी विकास आराखड्यावरून पुणे महापालिका प्रशासनास चांगलेच धारेवर धरले. "महापालिकेमध्ये ३४ गावे समाविष्ट होऊन अनेक वर्ष झाली, तरी अजूनही या गावांचा विकास आराखडा तयार झालेला नाही. आता तरी महापालिका आयुक्तांनी समाविष्ट गावांचा विकास आराखडा लवकर पूर्ण करण्यासाठी ठोस प्रयत्न करावेत. आता महापौर, विरोधी पक्षनेते किंवा तुम्हाला अडविणारे कोणी ही नाही, त्यामुळे कारणे देऊ नका, लवकर निर्णय घ्या. समाविष्ट गावांच्या विकासाला प्राधान्य द्या, " असं म्हणत अजित पवारांना विकास आराखड्याला गती देण्याचे आदेश दिले.**



लोहगाव येथील वाघोली समान पाणीपुरवठा, वडगाव शिंदे येथील जलजीवन योजनेचे उद्घाटन व धानोरीतील पाण्याच्या टाकीच्या कामाचे भूमिपूजनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार सुनील टिंगरे, अशोक पवार, चेतन तुपे, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे, रामभाऊ मोझे यांच्यासह वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी उपस्थित होते.

विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण होत असल्याने लोहगावला जाण्यासाठी नवीन पर्यायी रस्त्याची गरज आहे. हवाईदलाच्या हद्दीतून जाणाऱ्या रस्त्याचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा, असेही पवार यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सांगितले. अजित पवार म्हणाले, ""ससूनच्या धर्तीवर लोहगाव येथे होत असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाला चांगला निधी देतो, त्याचे काम लवकर पूर्ण करून घ्या. डांबरी रस्त्यांऐवजी कॉंक्रीटचे रस्ते चांगले असल्याचा अनुभव आपण मुंबई पुणे महामार्गावर घेतला आहे. त्यामुळे कॉंक्रीटचे रस्ते करण्यास प्राधान्य द्या. रिंगरोडच्या कामाला १८० कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. डिसेंबरपर्यंत रिंगरोडचे काम पूर्ण करायचे आहे."

देहू, आळंदी, चाकण, राजगुरुनगर येथे पूर्वी ग्रामपंचायती होत्या, तेव्हा गावांना बकालपणा येत असल्याने तिथे नगरपरिषद करण्यात आल्या. त्यानंतरही तेथे अनधिकृत बांधकामे वाढत असल्याने या निमशहरांचा असंतुलित विकास होत आहे. धनकवडीमध्येही पूर्वी याच पद्धतीने अनधिकृतपणे बांधकामे वाढली, धनकवडी महापालिकेत आल्यानंतर तेथील अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आले. म्हणूनच देहू, आळंदी, चाकण व राजगुरुनगरसाठी आता स्वतंत्र महापालिका करण्याचा विचार सुरु आहे. स्वतंत्र महापालिका झाल्यास नियमांचे पालन होईल, गैरप्रकारांवर नियंत्रण येईल, तसेच या गावांचा संतुलित विकास होण्यास मदत होईल. असेही पवार यांनी सांगितले.

### त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला नाही

तीस वर्षांपूर्वी राजकारणात आलो. तेव्हा, रामभाऊ मोझे स्कूटरवर फिरायचे, आता ते मार्गदर्शकांच्या भूमिकेत आहेत. त्याच पद्धतीने तुम्ही तरुणांना मार्गदर्शन करा, तरुणांना आता संधी द्या, अशी भूमिका आम्ही वरिष्ठांसमोर मांडत होतो. पण साठ वर्षांचा झालो, तरीही त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला नाही, ' अशा शब्दात अजित पवार यांनी शरद पवार यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली.

---

# पंडित दीनदयाल उपाध्याय याचे कार्य आदर्शवत

## शहराध्यक्ष शंकर जगताप: भाजपतर्फे पंडित दीनदयाल उपाध्याय यांना पुण्यतिथी निमित्त आदरांजली

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सेवा, सुशासन आणि विकास यातून 'अंत्योदय' संकल्प साकारण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी दिलेली मूल्ये आपल्या कर्तव्याचा मार्ग बनून मार्गदर्शन करतात. त्यांचे कार्य नेहमीच आदर्शवत ठरणारे आहे, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) अध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. अखंड मानवतावादाचे प्रणेते आणि कुशल संघटक आदरणीय पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजप पक्ष कार्यालयात रविवारी आदरांजली अर्पण करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.**



यावेळी, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस शीतल शिंदे, अजय पाताडे, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, संदीप नखाते, निलेश अष्टेकर, माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, माजी नगरसेवक यशवंत भोसले, महिला मोर्चा सरचिटणीस वैशाली खाड्ये, बेटी बचाव बेटी पढाव संयोजिका प्रीती कामतीकर, पंचायत राज जिल्हा संयोजक अभिजित बोरसे, प्रदेश सदस्य महेश बारसावडे, दत्तात्रय यादव, ज्येष्ठ नागरिक महेश कुलकर्णी, पराग जोशी, कन्हैया मुंदडा यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, सर्व मोर्चा / आघाडी / प्रकोष्ठ प्रमुख, मंडल पदाधिकारी,विधानसभा वॉरियर्स, शक्ति केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रखर राष्ट्रवादी आणि वंचितांच्या हक्काचे निर्माते, अत्यंत साधी जीवनशैली जगणाऱ्या आणि भारतीय संस्कृतीचा प्रवाह एकत्र आणणाऱ्या दीनदयाळजींचे जीवन हजारो भाजप कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी भारतीय संस्कृती आणि वारसा केंद्रस्थानी ठेवून देशाला पुढे नेण्याचा मार्ग दाखवला. पंडित दीनदयालजी यांचे जीवन हे राष्ट्रसेवेचे आणि समर्पणाचे महान प्रतीक आहे. कोणताही देश आपल्या संस्कृतीच्या मूलभूत कल्पना विसरून प्रगती करू शकत नाही, असा त्यांचा विश्वास होता. या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक महेश कुलकर्णी यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या कार्याचा उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे यांनी केले.

### तरच खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल

**जेव्हा जेव्हा मानवतेच्या कल्याणाचा प्रश्न येतो तेव्हा पंडितजींची अखंड मानवतावाद आणि अंत्योदयाची तत्त्वे ध्रुव तारेप्रमाणे संपूर्ण मानवजातीला मार्गदर्शन करतील. त्यांची मूल्ये पक्षासाठी नेहमीच मार्गदर्शक राहतील, असे मत व्यक्त करीत केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती "घर चलो अभियाना"च्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवून खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरणार आहे, असेही शंकर जगताप यांनी यावेळी सांगितले.**




# चांदनी चौकातून: ही गळचेपी तर नव्हे?

**नव्या संसदेच्या कुठल्याशा कोपऱ्यामध्ये 'मीडिया लाऊंज' नावाची छोटी खोली आहे, जिथं कोणी पत्रकार जातही नाही. कारण, ही खोली 'गावकुसाबाहेर' आहे. तिथं आसपास भटकणारी माकडंही येत नाहीत. मीडिया लाऊंजचा उपयोग फक्त पाणी पिण्यासाठी होतो कारण नव्या संसदेच्या कॅन्टिनमध्ये पाणी पिण्याची सुविधा उपलब्ध नाही.**



मजल्यावर एका टोकाला विमानतळासारखी पाणी पिण्याची सुविधा आहे, तिथून एक भांड पाणी पिणंदेखील शक्य नाही. 'मीडिया लाऊंज'च्या शेजारी पत्रकार परिषद घेण्यासाठी कक्ष बनवलेला आहे पण, गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ सरकारने राजकीय पक्षांच्या पत्रकार परिषदांवर बंदी घातलेली आहे. जुन्या संसदभवनामध्ये दोन मोठ्या कक्षांमध्ये अधिवेशनाच्या काळात काँग्रेस, भाजप, माकप अशा अनेक पक्षांचे नेते पत्रकार परिषद घेत असत. ही परंपरा मोदी सरकारने मोडून काढलेली आहे! करोनाच्या काळात वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींसाठी दोन आडोसे उभे केले गेले. तिथे येऊन सत्ताधारी नेते प्रामुख्याने पीयुष गोयल वा प्रल्हाद जोशी बाइट देत असत. आता फक्त एकच आडोसा शिल्लक राहिलेला आहे. नव्या संसद भवनामध्ये पत्रकारांवर इतका अंकुश आहे की त्याला कोणत्याही खासदाराशी बोलता येत नाही. जुन्या संसदेमध्ये कामकाज संपल्यावर पत्रकार कक्षातून खाली येऊन बाहेरच्या लॉबीमध्ये खासदारांशी बोलू शकत होते. अनेकदा मल्लिकार्जुन खरगे, डेरेक ओब्रायन, शरद पवार अशा अनेक वरिष्ठ नेत्यांशी दोन-पाच मिनिटे का होईना बोलणं होत असे. त्यातून अनेक राजकीय घडामोडींचा अंदाज येत असे. ही खासदारांशी संवाद साधण्याची व्यवस्थाही नष्ट करण्यात आली आहे. लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार एकमेकांना भेटू शकत नाहीत तर पत्रकारांची काय कथा ? पत्रकारांना खासदार-नेते भेटण्याची शक्यता मकरद्वाराच्या आतील चौकात निर्माण झाली होती. पण, या कॉरिडोरमध्ये पाऊल टाकण्यासही पत्रकारांना मनाई करण्यात आली आहे. याच कॉरिडोरमध्ये अमित शहा, नितीन गडकरी आदी मंत्र्यांचे कक्ष आहेत. आता त्यांच्या कक्षांपर्यंत पोहोचणेही शक्य नाही. मकरद्वार हे नव्या संसदेचे मुख्य प्रवेशद्वार आहे. याच द्वारावर केंद्रीय माहिती-प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी निमंत्रण दिलेल्या बॉलीवूडमधील अभिनेत्रींनी फोटोसेशन केलं होतं. आता मात्र इथल्या परिसराची सुरक्षा यंत्रणांनी नाकाबंदी केलेली आहे. तिथं उभ्या केलेल्या अडथळ्यांच्या पलीकडं जाऊन खासदारांशी बोलता येत नाही. तिथं उभं राहून खासदार फारसं बोलत नाहीत. त्यांच्या कार आलेल्या असतात, सुरक्षा यंत्रणा या गाड्यांना फारवेळ आवारात थांबू देत नाहीत. त्यामुळं खासदार कारमध्ये बसून निघून जातात. संसदेच्या आवारात, संसदेच्या इमारतीमध्ये, अगदी संसदेच्या आवाराबाहेर देखील दोन-चार जणांचा घोळका देखील उभा राहू दिला जात नाही. ही कथा 'नशीबवान' पत्रकारांची ज्यांना संसदेच्या आवारात येण्याची मुभा तरी आहे. बाकी अनेक पत्रकारांनी संसद कोसो लांब उभं राहून पाहायची. १७ वी लोकसभा आता संपुष्टात येत असल्याने जुलैमध्ये काय परिस्थिती असेल याची कल्पना करता येऊ शकेल. संसदेच्या सभागृहांमध्ये आक्रमक विरोधकांचा आवाज बंद करण्याचे दोन मार्ग असतात. पहिल्या बाकावर बसलेले अधीररंजन चौधरी, कल्याण बॅनर्जी वा दुसऱ्या-तिसऱ्या बाकावर बसलेले दानिश अली, सौगत राय या बिनधास्त नेत्यांना गप्प करायचं असेल तर त्यांच्याकडं अजिबात लक्ष न देता आपलं भाषण चालू ठेवणं किंवा मिस्किलपणे त्यांना प्रत्युत्तर देऊन त्यांच्या टोमण्यांमधील हवा काढून घेणं. बरेच मंत्री पहिला मार्ग पसंत करतात. नेहरू, इंदिरा, सोनिया-राहुल आदींवर टीका केली की, काँग्रेसवाले उसळतात मग, त्यांच्याकडं दुर्लक्ष करत भाषण पुढं न्यायचं. पण, अमित शहा, नरेंद्र मोदींसारखे पट्टीचे वक्ते दुसरा मार्ग निवडतात. टोमण्यांना टोमणे देत, हास्यमस्करी करत त्यांनी अनेकदा विरोधकांना गप्प बसवलं आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार सौगत राय यांचं वय बघून त्यांना माफ केलं जातं. सौगत राय यांनी लोकसभेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यावर खरंतर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती पण, ते नेहमीच टीकेच्या प्रत्युत्तराच्या तावडीतून निसटतात.

## संपादकीय »

### 'अंक' माझा वेगळा?

***लोकसंख्या-नियंत्रण करून, प्रगती साधून देशाच्या महसूलवाढीस हातभार लावणाऱ्या राज्यांच्या मागण्यांकडे विभाजनवादी नजरेतून पाहणे अयोग्यच..***

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांस राज्यासाठी केंद्राकडून अधिक महसूल-वाटा हवा आहे. तशी मागणी करण्यासाठी ते दिल्लीत धडकले तर त्याची संभावना अर्थमंत्र्यांनी खोटारडे अशी केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिद्धरामय्या यांच्या पक्षावर उत्तर-दक्षिण भेदभाव निर्माण करीत असल्याचा आरोप केला. पंतप्रधान म्हणून मोदी यांच्या भूमिकेविषयी सहानुभूती. याचे कारण गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी असताना नरेंद्र मोदी यांनी केंद्राविषयी असाच एल्गार वारंवार केला होता आणि केंद्र हे गुजरातवर अन्याय करते असे त्यांचे तेव्हा म्हणणे होते. तेव्हा अहमदाबादेतून दिसणारा भारत हा दिल्लीतून दिसणाऱ्या भारतापेक्षा वेगळा असू शकतो हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदी असतानाची भूमिका पंतप्रधानपदी गेल्यावर बदलू शकते हे सत्यही लक्षात येईल.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीविषयी राज्य सरकार करीत असलेल्या प्रयत्नांचे सविस्तर विवेचन केले. देशातील सर्वाधिक पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे महाराष्ट्रात सुरू असून मुंबई महानगर प्रदेश हा देशाच्या विकासाला मोठा हातभार लावेल, असा विश्वास व्यक्त केला.**

# महाराष्ट्र हेच माझे कुटुंब, माझी जबाबदारी!



आमचे सरकार सर्वसामान्य जनतेचे सरकार असून गेल्या दोन वर्षांत आम्ही उत्तम निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. आम्ही जे जे निर्णय घेतले ते लोकहिताचे होते. हे सरकार आज पडणार, उद्या पडणार, परवा पडणार अशा रोजच्या वावड्या उडत होत्या. पण आमचे सरकार अतिशय मजबुतीने उत्तमपणे काम करीत आहे. मी आणि माझे सरकार गेले वीस महिने सातत्याने जनतेमध्ये जाऊन आणि प्रत्येक प्रसंगाला खंबीरपणे सामोरे जाऊन लोकहिताचे काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मला काय मिळाले, यापेक्षा मी या राज्याला काय दिले, मी देशाला काय देणार आहे ही भावना मनामध्ये ठेवून राज्यकर्त्यांनी काम केले पाहिजे. पण कधीतरी आठवण आली की बाहेर पडायचे, दोन-चार सभा घ्यायच्या आणि तथ्यहीन आरोप करायचे, अशा लोकांचा देखील अनुभव आपण घेतला आहे. पण आताचा शिवसेना पक्ष, हा अशा लोकांचा नाही. मी आणि माझं कुटुंब म्हणणाऱ्यांचा हा पक्ष नाही तर २४ तास घराचे दरवाजे शिवसैनिकांसाठी उघडे ठेवणाऱ्या बाळासाहेबांचा हा पक्ष आहे. या ठिकाणी आपल्याला राजकीय भाषण करायचे नाही. परंतु शेवटी बाळासाहेबांची भूमिका आणि या सर्वसामान्य माणसाची भूमिका डोळ्यासमोर ठेवून आम्ही सरकार स्थापन केले. माझं कुटुंब माझी जबाबदारी एवढ्या पुरता मर्यादित न राहता अख्खा महाराष्ट्र हे आपले कुटुंब आहे ही भावना ठेवून २४ तास कार्यकर्त्यांसाठी, जनतेसाठी काम करण्याची आपली भूमिका आहे. म्हणूनच काम करणाऱ्यांच्या म्हणजेच महायुतीच्या मागे राज्यातील जनता उभी आहे. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, जिथे पायाभूत सुविधांची सर्वाधिक कामे सुरू आहेत. पूर्वीच्या सरकारने अनेक प्रकल्पांसमोर अडथळे निर्माण केले होते. आमच्या सरकारने मात्र या सर्व पायाभूत सुविधा, मेट्रो प्रकल्पातील अडथळे दूर केले असून आता सर्व प्रकल्पांची कामे गतीने सुरू आहेत. गेल्या महिन्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते अटल सेतूचे लोकार्पण झाले. लवकरच सागरी मार्ग आणि मेट्रो-३ सुरू होईल. ठाणे- बोरिवली भुयारी मार्गालाही आता मंजुरी मिळाली आहे. महानगर प्रदेशात ३४० किमी लांबीचे मेट्रो जाळे विस्तारते आहे. बुलेट ट्रेनच्या कामातील अडथळे दूर झाले आहेत. महानगर प्रदेशाचा कायापालट करणारे असे अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यातील काही प्रकल्प पूर्णत्वाकडे आहेत, काही प्रगतिपथावर आहेत तर काहींची कामे लवकरच सुरू होणार आहेत. या प्रकल्पांमुळे महानगर प्रदेशात आर्थिक विकासाची नवी केंद्रे उदयाला येणार आहेत. मुंबई हे देशाचे ग्रोथ इंजिन समजले जायचे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# योगी आदित्यनाथ यांचा अभ्यास कमी!

## शिवाजी महाराजांच्या विधानावरून अजित पवार गटाची टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थ रामदास स्वामी यांनी घडवलं, असं विधान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आळंदी येथे केलं आहे. त्यानंतर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी यावर आक्षेप नोंदविला. तसेच अजित पवार गट यावर काय प्रतिक्रिया देणार? भाजपाबरोबर गेल्यानंतर जुनी भूमिका सोडली का? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला होता.**



त्याला आता अजित पवार गटाकडून अमोल मिटकरी यांनी उत्तर दिले आहे. अमोल मिटकरी यांनी मागेही एकदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीम बागेतील मुख्यालयात जाण्यावरून भाजपाला सुनावले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांनी भाजपाच्या नेत्याला सुनावण्याची भूमिका घेतली आहे. त्याआधी आपण मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ नेमके काय म्हणाले होते, हे पाहू. योगी आदित्यनाथ यांनी आळंदीत सुरू असलेल्या गीता-भक्ति अमृत महोत्सवाला उपस्थिती लावली. यावेळी आपल्या भाषणात योगी आदित्यनाथ म्हणाले, "समर्थ रामदास स्वामी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण भारतभर चेतना निर्माण केली. त्या कालखंडात औरंगजेबाच्या सत्तेला आव्हान देत असताना त्यांनी औरंगजेबाला इथे मरण्यासाठी सोडलं. तेव्हापासून आजपर्यंत औरंगजेबाला कुणीही विचारत नाही. ही शौर्य आणि पराक्रमाची धरणी आहे, कारण या मातीत पूज्य संतांचे सानिध्य प्राप्त झाले."यावर उत्तर देताना अमोल मिटकरी म्हणाले की, योगी आदित्यनाथ यांचे विधान अत्यंत चुकीचे आहे. इतिहासाचा अभ्यासक म्हणून मी हे कधीही स्वीकारू शकत नाही. राजमाता जिजाऊ याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शक गुरू होत्या. योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेशचे असल्यामुळे त्यांचा महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास नसेल, त्यांनी तो करावा. माध्यमांना प्रतिक्रिया देताना अमोल मिटकरी पुढे म्हणाले की, योगी आदित्यनाथ यांनी गोविंददेव गिरी महाराजांबद्दल काय बोलावे, हा त्यांचा अधिकार आहे. पण खरे शिवचरित्र लोकांसमोर आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शिवरायांच्या गुरू फक्त आणि फक्त राजमाता जिजाऊ होत्या आणि आध्यात्मिक गुरू म्हणून संत तुकाराम यांनी कार्य केले.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या विधानाचा शरद पवार यांनीही विरोध केला. "छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वामागे राजमाता जिजाऊ यांचा हात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना घडविण्याचे कर्तुत्व राजमाता जिजाऊंचे आहे. हे कर्तुत्व दुसऱ्या व्यक्तीला देण्याचा प्रयत्न करत आहेत. पण संबंध जगाला इतिहास माहीत आहे", अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ नेमके काय म्ह णाले होते, हे पाहू. योगी आदित्यनाथ यांनी आळंदीत सुरू असलेल्या गीता- भक्ती अमृत महोत्सवाला उपस्थिती लावली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण भारतभर चेतना निर्माण केली. त्या कालखंडात औरंगजेबाच्या सत्तेला आव्हान देत असताना त्यांनी औरंगजेबाला इथे मरण्यासाठी सोडलं. तेव्हापासून आजपर्यंत औरंगजेबाला कुणीही विचारत नाही. ही शौर्य आणि पराक्रमाची धरणी आहे, कारण या मातीत पूज्य संतांचे सानिध्य प्राप्त झाले.

### राजमाता महाराजांच्या मार्गदर्शक गुरू

» छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थ रामदास स्वामी यांनी घडवलं, असं विधान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आळंदी येथे केलं आहे. त्यानंतर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी यावर आक्षेप नोंदविला. तसेच अजित पवार गट यावर काय प्रतिक्रिया देणार? भाजपाबरोबर गेल्यानंतर जुनी भूमिका सोडली का? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना अमोल मिटकरी म्हणाले की, योगी आदित्यनाथ यांचे विधान अत्यंत चुकीचे आहे. इतिहासाचा अभ्यासक म्हणून मी हे कधीही स्वीकारू शकत नाही. राजमाता जिजाऊ याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शक गुरू होत्या. योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेशचे असल्यामुळे त्यांचा महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास नसेल, त्यांनी तो करावा. माध्यमांना प्रतिक्रिया देताना अमोल मिटकरी पुढे म्हणाले की, योगी आदित्यनाथ यांनी गोविंददेव गिरी महाराजांबद्दल काय बोलावे, हा त्यांचा अधिकार आहे. पण खरे शिवचरित्र लोकांसमोर आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शिवरायांच्या गुरू फक्त आणि फक्त राजमाता जिजाऊ होत्या आणि आध्यात्मिक गुरू म्हणून संत तुकाराम यांनी कार्य केले.त्याला आता अजित पवार गटाकडून अमोल मिटकरी यांनी उत्तर दिले आहे. इतिहासाचा अभ्यासक म्हणून मी हे कधीही स्वीकारू शकत नाही. राजमाता जिजाऊ याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शक गुरू होत्या.

# खासदार अमोल कोल्हे अजित पवार गटात जाणार?

## अजित पवार गट अमोल कोल्हे यांच्यात सध्या शाब्दिक युद्ध चालू

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार तसेच शरद पवार गटातील खासदार अमोल कोल्हे यांच्यात सध्या शाब्दिक युद्ध चालू आहे. "शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी आमच्याकडे पर्यायी उमेदवार असून पुढच्या निवडणुकीत आमचा उमेदवार आम्ही निवडून आणू," असं वक्तव्य करत अजित पवार यांनी अमोल कोल्हे यांना आव्हान दिलं आहे.**



अजित पवारांचं आव्हान स्वीकारत अमोल कोल्हे म्हणाले, "१०० टक्के मी निवडणूक लढवणार. शरद पवार घेतील तो निर्णय मला मान्य असेल." तसेच अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांचं आव्हान स्वीकारलं आहे. अजित पवार विरुद्ध अमोल कोल्हे असा सामना चालू असताना अजित पवार गटाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी यात उडी घेतली आहे. अमोल मिटकरी यांनी काही वेळापूर्वी अकोला येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, अजित पवारांनीच अमोल कोल्हे यांना लोकसभेचं तिकिट दिलं होतं. त्यांना पूर्ण पाठबळ देऊन निवडून आणलं. त्यामुळे आतादेखील अजित पवार ज्याला उमेदवारी देतील तोच उमेदवार शिरूरची लोकसभा निवडणूक जिंकणार. अजित पवार यांनी आव्हान दिलं आहे म्हटल्यावर ते आमचा उमेदवार निवडून आणणारच. याआधी त्यांनी विजय शिवतारेंना पराभूत करण्याचं आव्हान दिलं होतं. त्यांनी ते करून दाखवलं. त्यानंतर अजित पवार म्हणाले, मी अमोल मिटकरीला आमदार करेन, त्यांनी मला आमदार केलं.

### विजय हा तगड्या पैलवानाचा होतो

» अजित पवार शब्दाचे पक्के आहेत. त्यामुळे भविष्यात शिरूरचा गड अजित पवारांकडेच असेल.दरम्यान, अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांचं आव्हान स्वीकारलं आहे. यावर अमोल मिटकरी म्हणाले, कुस्तीच्या फडात उतरल्यावर आव्हान स्वीकारलंच पाहिजे. शेवटी विजय हा तगड्या पैलवानाचा होतो. अजित पवार आणि अमोल कोल्हे यांची तुलना होऊ शकत नाही. अजित पवार मोठे नेते आहेत आणि अमोल कोल्हे सामान्य कार्यकर्ते आहेत.दरम्यान, अमोल कोल्हे अजित पवार गटात जाणार का? यावरही अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली. अजित पवारांच्या पाठिंब्यामुळेच अमोल कोल्हे लोकसभा निवडणुकीत जिंकले होते. भाजपाबरोबर जाण्यासाठी पक्षातील पदाधिकारी-आमदार खासदारांनी अजित पवार यांना शपथपत्रं दिली होती.

# पाकिस्तानमध्ये मतमोजणी पूर्ण!

## इम्रान खान तुरुंगात; निवडणूक लढवण्यास मनाई करण्यात आली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पाकिस्तानच्या राष्ट्रीय निवडणुकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. नेहमीप्रमाणे याही निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला. मात्र आता या निवडणुकीची मतमोजणी संपली असून माजी पंतप्रधान इम्रान खान यांची लोकप्रियता कमी झालेली नाही, हे या निकालावरून स्पष्ट झाले. इम्रान खान हे तुरुंगात असले तरी त्यांचे समर्थन असलेल्या एकूण १०१ अपक्ष उमेदवारांनी विजय मिळवला आहे. तर माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्या पीएमल-एन पक्षाने एकूण ७५ जागांवर बाजी मारली आहे.**



इम्रान खान संध्या तुरुंगात आहेत. त्यांना ही निवडणूक लढवण्यास मनाई करण्यात आली होती. तसेच त्यांच्या पीटीआय पक्षाचे चिन्हही तात्पुरते गोठवण्यात आले. त्यामुळे इम्रान खान यांच्या पक्षातील नेत्यांना अपक्ष म्हणून निवडणूक लढवावी लागली. तरीदेखील या निवडणुकीत इम्रान खान यांचे समर्थन असलेले अपक्ष उमेदवारच अनेक जागांवर सरस ठरले आहेत. पाकिस्तानी निवडणूक आयोगानुसार इम्रान खान यांचा पाठिंबा असलेल्या एकूण १०१ अपक्ष उमेदवारांचा विजय झाला आहे. तर नवाझ शरीफ यांच्या पीएमएल-एन पक्षाने ७५ जागांवर विजय मिळवला आहे. पाकिस्तान पीपल्स पार्टीने ५४ जागांवर बाजी मारली आहे.पाकिस्तानच्या राष्ट्रीय निवडणुकीत तेथील लष्कराचा हस्तक्षेप असतो. त्यामुळे लष्कराने ज्या नेत्याला पाठिंबा दिला, तोच नेता या निवडणुकीत विजयी होतो, असे म्हटले जाते. यावेळी लष्कराने आपली ताकद नवाझ शरीफ यांच्या पाठीमागे उभी केली होती. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत नवाझ शरीफ हेच बाजी मारतील असा अंदाज व्यक्त केला जात होता. प्रत्यक्ष निकाल मात्र काहीसा वेगळा लागला आहे. येथे इम्रान खान यांचा पाठिंबा लाभेलेले अपक्ष उमेदवार अनेक जागांवरून विजयी झाले आहेत. तर नवाझ शरीफ यांचा पक्ष विजयी उमेदवारांच्या तुलनेत थेट दुसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे. या निकालानंतर पाकिस्तानचे राष्ट्रपती डॉ. आरीफ अलवी यांनी समाजमाध्यमांवर तेथील जनतेचे अभिनंदन केले. या निवडणुकीत तेथील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. याचाही उल्लेख करत अलवी यांनी पाकिस्तानी महिलांचे अभिनंदन केले. तर नवाझ शरीफ यांच्या पक्षातील नेते आझम नाझीर तारा यांनी निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप केला. या गैरप्रकाराच्या विरोधात आम्ही न्यायालयात धाव घेणार आहोत, असे आझम यांनी स्पष्ट केले. तर दुसरीकडे इम्रान खान यांचा पाठिंबा असलेल्या अनेक अपक्ष उमेदवारांनी नवाझ शरीफ, नवाझ शरीफ यांची कन्या मरिअम शरीफ, माजी संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांच्या विजयावर आक्षेप घेतला आहे.निवडणुकीचा निकाल स्पष्ट झाल्यामुळे आता पाकिस्तानच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पक्षांचे समर्थक रस्त्यावर उतरले आहेत. या समर्थकांकडून आंदोलन केले जात आहे. परिणामी पाकिस्तान पोलीस, सुरक्षा रक्षकांकडून आंदोलकांना ताब्यात घेतले जात आहे.दरम्यान, निकाल स्पष्ट झाल्यामुळे आता येथे सत्तास्थापनेला वेग आला आहे. नवाझ शरीफ यांच्या पीएमएल-एन पक्षाकडून वेगवेगळ्या पक्षाला युतीसाठी पाचारण केले जात आहे. नुकतेच या पक्षाने मुत्ताहिदा कोमी मुव्हमेंट पाकिस्तान (एमक्यूएम-पी) या पक्षाशी आमची चर्चा चालू आहे, असे सांगितले. तर एमक्यूएम-पी पक्षाचे प्रवक्ते सिद्दिकी यांनी मात्र सरकार स्थापनेबाबत आमची पीएमएल-एन या पक्षाशी कोणतीही चर्चा झालेली नाही, असे स्पष्ट केले. त्यामुळे आगामी काळात पाकिस्तानमध्ये कोण पंतप्रधान होणार? कोणाचे सरकार येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. इम्रान खान संध्या तुरुंगात आहेत. त्यांना ही निवडणूक लढवण्यास मनाई करण्यात आली होती. तसेच त्यांच्या पीटीआय पक्षाचे चिन्हही तात्पुरते गोठवण्यात आले. त्यामुळे इम्रान खान यांच्या पक्षातील नेत्यांना अपक्ष म्हणून निवडणूक लढवावी लागली. तरीदेखील या निवडणुकीत इम्रान खान यांचे समर्थन असलेले अपक्ष उमेदवारच अनेक जागांवर सरस ठरले आहेत. पाकिस्तानी निवडणूक आयोगानुसार इम्रान खान यांचा पाठिंबा असलेल्या एकूण १०१ अपक्ष उमेदवारांचा विजय झाला आहे. तर नवाझ शरीफ यांच्या पीएमएल-एन पक्षाने ७५ जागांवर विजय मिळवला आहे.

### आसिफ यांच्या विजयावर आक्षेप

» पाकिस्तान पीपल्स पार्टीने ५४ जागांवर बाजी मारली आहे. पाकिस्तानच्या राष्ट्रीय निवडणुकीत तेथील लष्कराचा हस्तक्षेप असतो. त्यामुळे लष्कराने ज्या नेत्याला पाठिंबा दिला, तोच नेता या निवडणुकीत विजयी होतो, असे म्हटले जाते. यावेळी लष्कराने आपली ताकद नवाझ शरीफ यांच्या पाठीमागे उभी केली होती. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत नवाझ शरीफ हेच बाजी मारतील असा अंदाज व्यक्त केला जात होता. प्रत्यक्ष निकाल मात्र काहीसा वेगळा लागला आहे. येथे इम्रान खान यांचा पाठिंबा लाभेलेले अपक्ष उमेदवार अनेक जागांवरून विजयी झाले आहेत. तर नवाझ शरीफ यांचा पक्ष विजयी उमेदवारांच्या तुलनेत थेट दुसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे.या निकालानंतर पाकिस्तानचे राष्ट्रपती डॉ. आरीफ अलवी यांनी समाजमाध्यमांवर तेथील जनतेचे अभिनंदन केले. या निवडणुकीत तेथील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. याचाही उल्लेख करत अलवी यांनी पाकिस्तानी महिलांचे अभिनंदन केले. विरोधात आम्ही न्यायालयात धाव घेणार आहोत, असे आझम यांनी स्पष्ट केले. तर दुसरीकडे इम्रान खान यांचा पाठिंबा असलेल्या अनेक अपक्ष उमेदवारांनी नवाझ शरीफ, नवाझ शरीफ यांची कन्या मरिअम शरीफ, माजी संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांच्या विजयावर आक्षेप घेतला आहे.

# हंगेरीच्या राष्ट्रपती कॅटालीन नोव्हॅक यांचा राजीनामा

## लैंगिक अत्याचारातील दोषीची शिक्षा माफ केल्यामुळे पायउतार!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**हंगेरीच्या राष्ट्रपती कॅटालीन नोव्हॅक यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. बाल लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात सामील असलेल्या एका व्यक्तीची शिक्षा माफ केल्यामुळे त्यांच्याविरोधात जनतेतून रोष व्यक्त करण्यात येत होता. हंगेरीतील अनेक लोक रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी स्वीकारत त्यांनी आपल्या राष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला आहे.**

नोव्हॅक या हंगेरीचे पंतप्रर्धान विक्टोर ओरबन यांच्या जवळच्या सहकारी मानल्या जातात. त्यांच्या या निर्णयानंतर हंगेरीच्या माजी कायदामंत्री जुडीत वार्गा यांनीदेखील सार्वजनिक जीवनापासून संन्यास घेत असल्याचे जाहीर केले. नोव्हॅक यांच्या या निर्णयामुळे हंगेरीतील नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत होती. तसेच विरोधातील राजकीय पक्ष आणि नेत्यांकडून सरकारवर टीका केली जात होती. या निर्णयाला विरोध म्हणून राष्ट्रपतीभवनासमोर लोकांनी आंदोलनाला सुरुवात केली होती. त्यामुळे हंगेरीतल सरकार



अडचणीत सापडले होते. शेवटी दबाव वाढू लागल्यामुळे हंगेरीच्या राष्ट्रपती कॅटालीन नोव्हॅक यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.हा राजीनामा देताना 'मी माझ्या पदाचा राजीनामा देत आहे. माझ्या निर्णयामुळे ज्यांच्या भावना दुखावल्या तसेच मी त्यांच्या सोबत नाही, त्यांना पाठिंबा देत नाही, असे वाटणाऱ्या पीडितांची मी माफी मागते. मी नेहमी लहान मुलं आणि कुटुंबांचे रक्षण करण्याच्या भूमिकेत राहिलेली आहे. भविष्यातही माझी हीच भूमिका असेल,' असे कॅटालीन नोव्हॅक म्हणाल्या.नोव्हॅक यांनी एका बालसुधारगृहाच्या माजी उपसंचालकाची शिक्षा माफ केली. आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या बाल लैंगिक अत्याचारावर पडदा टाकण्याचे काम या उपसंचालकाने केले, असा आरोप करण्यात आला होता.

### जनतेची मागितली माफी

» मात्र या उपसंचालकाला नोव्हॅक यांनी माफी दिली. गेल्या वर्षाच्या एप्रिल महिन्यात पोप फ्रान्सिस यांनी बुडापेस्टला भेट दिली होती. याच काळात नोव्हॅक यांनी या उपसंचालकाची शिक्षा माफ करण्याचा निर्णय घेतला होता.दरम्यान, कॅटालीन नोव्हॅक यांनी राजीनामा दिल्यानंतर हंगेरीच्या संसदेचे अध्यक्ष लॅस्लो कोव्हर यांची हंगामी राष्ट्रपती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हंगेरीच्या राष्ट्रपती कॅटालीन नोव्हॅक यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. बाल लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात सामील असलेल्या एका व्यक्तीची शिक्षा माफ केल्यामुळे त्यांच्याविरोधात जनतेतून रोष व्यक्त करण्यात येत होता.हंगेरीतील अनेक लोक रस्त्यावर उतरले होते.

# कार्तिक आर्यनला भेटायला केला ११६० कीमी प्रवास

कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी 'चंदू चॅम्पियन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. कार्तिकने चित्रपटासाठी जबरदस्त ट्रांसफॉर्मेशन केले, ज्याचे सोशल मीडियावर खूप कौतुक झाले. बॉलिवूडमधील टॉप कलाकारांपैकी एक असलेल्या कार्तिकचे फॅन फॉलोइंगही गेल्या काही वर्षात प्रचंड वाढले आहे. या काळात कार्तिकची क्रेझ तरुणांमध्ये वाढली अन् याचेच एक दृश्य शनिवारी मुंबईतील अभिनेत्याच्या घराबाहेर पाहायला मिळाले.कार्तिकच्या एका चाहत्याने त्याला त्याच्या घराबाहेर येऊन एक मोठं सरप्राइज दिलं आहे. उत्तर प्रदेशातील झाशी जिल्ह्यातून आलेल्या कार्तिकच्या एका चाहत्याने ११६० किलोमीटर सायकलवर प्रवास करत केवळ कार्तिकला भेटण्यासाठी मुंबई गाठली. कार्तिक आर्यननेही त्याच्या चाहत्याला निराश न करता घराबाहेर पडून तयाची भेट घेतली. यादरम्यान कार्तिकने इतर फॅन्सबरोबर फोटोदेखील काढले. कार्तिकही त्याच्या चाहत्याशी थोडा वेळ बोलला. यादरम्यान त्या तरुणाने सांगितले की, झाशीहून सायकलने मुंबईला पोहोचण्यासाठी त्याला एकूण ९ दिवस लागले.एका चाहत्याने आपल्या प्रेमाखातर इतकी भारावून टाकणारी गोष्ट केल्याचं ऐकून कार्तिकची खूप खुश झाला. त्याने त्याची विचारपुस केली,





गप्पा मारल्या. याबरोबरच त्या चाहत्याचे आभारही कार्तिकने मानले. सोशल मीडियावर कार्तिक आणि त्याच्या या अनोख्या चाहत्याचा व्हिडीओ जबरदस्त व्हायरल होत आहे.कार्तिक आर्यन सध्या 'चंदू चॅम्पियन' चित्रपटामुळे चर्चेत आहे. दिग्दर्शक कबीर खान यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. चित्रपटाच्या शूटिंगसाठी कार्तिकने आपल्या शरीरात कमालीचा बदल केला. या ट्रांसफॉर्मेशनसाठी कार्तिकने वर्षभर प्रचंड मेहनत घेतली आहे तसेच त्याने गोड पदार्थांचे सेवनही बंद केले होते. कार्तिकचे चाहते त्याच्या या आगामी चित्रपटाची आतुरतेने वाट बघत आहेत.कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी 'चंदू चॅम्पियन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. कार्तिकने चित्रपटासाठी जबरदस्त ट्रांसफॉर्मेशन केले, ज्याचे सोशल मीडियावर खूप कौतुक झाले. बॉलिवूडमधील टॉप कलाकारांपैकी एक असलेल्या कार्तिकचे फॅन फॉलोइंगही गेल्या काही वर्षात प्रचंड वाढले आहे.

## ओम शब्द आणि भगवा रंग

सध्या बॉलिवूडमध्ये ऐतिहासिक घटना किंवा वीर-पुरुषांवर बेतलेल्या चित्रपटांचा ट्रेंड पाहायला मिळत आहे. वेगवेगळे वादग्रस्त, संवेदनशील तसेच ज्वलंत विषय हे बऱ्याच नव्या दिग्दर्शकांकडून हाताळले जात आहेत. अशातच आता 'हैदराबाद मुक्ती संग्राम' यावर बेतलेल्या आगामी 'रजाकार' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतने हा ट्रेलर सादर केला असून सोशल मीडियावर याची जबरदस्त चर्चा आहे.झालेले अत्याचार आणि नरसंहार, तेव्हाची राजकीय परिस्थिति, भारत सरकारने त्यात केलेला हस्तक्षेप आणि सरदार वल्लभभाई पटेल व तत्कालीन सरकारने हैदराबादसाठी घेतलेले काही कठोर निर्णय आणि एकूणच निजामाचं साम्राज्य टिकवू पाहणारी वृत्ती अशा बऱ्याच गोष्टींची झलक या ट्रेलरमध्ये पाहायला मिळत आहे.

## लियाची हुबेहुब मिमिक्री



सोशल मीडियावर असंख्य कंटेंट क्रिएटर्स आहेत. पण काही कंटेंट क्रिएटर्सनी आपल्यातल्या वेगळ्या कौशल्याने नेटकऱ्यांसह सेलिब्रिटींची मनं जिंकली आहे. त्यापैकी एक म्हणजे २४ वर्षांची कंटेट क्रिएटर चांदनी भाभदा. सोशल मीडियावर ती चांदनी मिमिक म्हणून खूप प्रसिद्ध आहे. चांदनी आलिया भट्टची हुबेहुब मिमिक्री करते. तिच्या या कौशल्याचे आलियाने देखील कौतुक केलं होतं. अशा या लोकप्रिय कंटेंट क्रिएटर चांदनी भाभदाने अक्षय कुमारचा फ्लॅट खरेदी केल्याचं समोर आलं आहे. चांदनी भाभदाने अक्षय कुमारचा अंधेरीतला फ्लॅट खरेदी केला आहे. तिने गृहप्रवेश करतानाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. पहिल्या दोन फोटोंमध्ये चांदनी पूजा-अर्चा करताना दिसत आहे. तर तिसऱ्या फोटोमध्ये डोक्यावर कलश घेऊन गृहप्रवेश करताना चांदनी दिसत आहे. हे गृहप्रवेशाचे फोटो शेअर करत तिने लिहिलं आहे, "वयाच्या २५ वर्षांच्या आधी घर खरेदी केलं. घराचा ईएमआय भरत आहे."अवघ्या वयाच्या २४व्या वर्षी चांदनीने स्वतःचं घर घेण्याचं स्वप्न पूर्ण केल्यामुळे कलाकार मंडळींसह, इतर कंटेंट क्रिएटर्स व चाहते तिला शुभेच्छा देत आहेत. नुपूर सेनॉन, सई गोडबोले, अभिषेक निगम, असीस कौर अशा अनेकांनी चांदनीला शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, चांदनीचे इन्स्टाग्रामवर 495K फॉलोअर्स आहेत. तिने वकिलीचे शिक्षण घेतले आहे. ती व्हीजे म्हणजे व्हिडीओ जॉकी आहे. पण ती पूर्णपणे वेळ कंटेंट क्रिएटरचं काम करते.

## आमिर खानची झाली होती 'अशी' अवस्था

आमिर खानची पूर्वाश्रमीची पत्नी किरण राव सध्या तिच्या 'लापता लेडीज' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. १ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे सध्या या चित्रपटाचं प्रमोशन जोरदार सुरू आहे. अशात किरण रावने 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटाच्या अपयशावर प्रतिक्रिया दिली आहे. आमिर खान व करीना कपूर अभिनीत 'लाल सिंग चड्ढा' २०२२ साली प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर हा चित्रपटात फ्लॉप झाला. ६० कोटींची कमाई 'लाल सिंग चड्ढा'ने केली होती. या चित्रपटाच्या अपयशाचा परिणाम आमिर खानवर झाला होता.नुकतीच किरण रावने 'झूम' एंटरटेनमेंट चॅनेलला मुलाखती दिली. यावेळी ती 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटाच्या अपयशाबद्दल बोलली. किरण म्हणाली, "'लाल सिंग चड्ढा' फ्लॉप होणं हे खरंच निराशाजनक होतो. जेव्हा तुम्ही खूप प्रयत्न करता आणि तरीही काम होत नाही, तसंच काहीस 'लाल सिंग चड्ढा'बरोबर झालं. या चित्रपटाच्या अपयशाचा परिणाम आमिरवर खूप जास्त झाला. एवढंच नाहीतर चित्रपटाच्या संपूर्ण टीमवर परिणाम झाला." पुढे किरण राव म्हणाली, "आमिरसाठी 'लाल सिंग चड्ढा' ड्रीम प्रोजेक्ट होता. त्याने चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी या चित्रपटाच्या स्क्रिप्टचे हक्क मिळवण्यासाठी खूप प्रयत्न केले होते. या चित्रपटाला यश मिळण्यासाठी आमिरने प्रचंड काम केलं होतं. पण अखेर हा चित्रपट अपयशी ठरला. सोशल मीडियावर 'लाल सिंग चड्ढा'बाबत सकारात्मक प्रतिक्रिया होत्या. मात्र, शेवटी मी आमिरला वस्तुस्थिती स्वीकारण्यास सांगितलं."दरम्यान, 'लाल सिंग चड्ढा' चित्रपटात आमिर, करीना व्यतिरिक्त मोना सिंह आणि नागा चैतन्य यांनी प्रमुख भूमिका साकारली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन अद्वैत चंदनने केलं होतं. हा चित्रपट टॉम हँक्सच्या १९९४ सालच्या 'फॉरेस्ट गंप'चा हिंदी रिमेक होता.आमिर खानची पूर्वाश्रमीची पत्नी किरण राव सध्या तिच्या 'लापता लेडीज' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. १ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## राजकारणात येण्यावर कंगनानं दिली मोठी प्रतिक्रिया!



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री कंगना ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया अन् वक्तव्यांसाठी चर्चेत असते. त्यावरुन तिला अनेकदा ट्रोलही व्हावे लागले आहे. मात्र आपल्या वक्तव्यावर ठाम राहून तिनं अनेकांची नाराजीही ओढावून घेतल्याचे दिसून आले आहे. कंगनानं यापूर्वी देखील तिच्या राजकीय प्रवेशाविषयी वक्तव्यं केली आहे. आता एका मुलाखतीमध्ये तिला पुन्हा त्यावरुन विचारण्यात आलेल्या प्रश्नावर तिनं दिलेलं उत्तर तिच्या चाहत्यांच्या चर्चेचा विषय आहे. कंगना राजकारणातील प्रवेशाविषयी काय म्हणाली हे आपण जाणून घेणार आहोत. सध्या कंगनाचा भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आयुष्यावर आधारित इमर्जन्सीनावाच्या चित्रपटाची चर्चा आहे. त्यात तिनं इंदिरा गांधी यांची व्यक्तिरेखा साकारली आहे. जून महिन्यात हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्या निमित्तानं तिनं दिलेल्या एका मुलाखतीतलं ते वक्तव्य लक्ष वेधून घेत आहे. कंगनाला त्या मुलाखतीमध्ये तुला देशाचा प्रधानमंत्री व्हायला आवडेल का असा प्रश्न विचारण्यात आला होता.त्यावर तिनं दिलेलं उत्तर हे चर्चेत आहे. कंगनाच्या त्या चित्रपटातील इंदिरा गांधी यांच्या भूमिकेतील लूक पाहून तिचं नेटकऱ्यांनी कौतुक केलं होतं. त्यानंतर या चित्रपटाचे चाहत्यांना वेध लागले आहेत. कंगना म्हणते, कला हा एक व्यवसाय आहे. कलाकारांवर सरस्वती देवीची कृपा असते. तुम्हाला माहिती आहे की, आपण राजकारणाकडे कोणत्या नजरेनं पाहतो. त्या जगात जाण्याची माझी काही इच्छा नाही. मला त्याचा भागही व्हायचं नाही. मी कलाकार आहे आणि मला तेच काम करायला आवडेल.

# भारताची ‘आदर्श’ झुंज अपयशी!

## विश्वविजेतेपदाचं स्वप्न भंगलं; ऑस्ट्रेलिया ठरली अव्वल!

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था




**भारताच्या वरिष्ठ संघाप्रमाणेच युवा संघाचंदेखील विश्वविजेतेपदाचं स्वप्न भंगलं आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत रोहित शर्माच्या भारतीय संघाला अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने पराभवाची धूळ चारली होती. अशीच काहीशी अवस्था भारताच्या युवा संघाचीदेखील झाली आहे. यंदाच्या १९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा ७९ धावांनी पराभव केला आहे.**

या सामन्यात ऑस्ट्रेलियन कर्णधार ह्यू वैबगेन याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. पहिल्या डावात फलंदाजी करताना कांगारुंच्या संघाने निर्धारित ५० षटकांमध्ये ७ बाद २५३ धावा करत भारतासमोर २५४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघ सपशेल अपयशी ठरला. भारत निर्धारित ५० षटकंदेखील खेळू शकला नाही. भारतीय संघांला ४३.५ षटकांत केवळ १७४ धावांपर्यंत मजल मारता आली. सलामीवीर आदर्श सिंह (४७) आणि खालच्या फळीत मुरुगन अभिषेक (४२) या दोघांनी थोडीफार झुंज दिली. परंतु, ते दोघे या सामन्यात भारताला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.या सामन्यात आदर्श आणि मुरुगन अभिषेक व्यतिरिक्त कुठल्याही भारतीय फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. संघातील ७ खेळाडू दुहेरी धावसंख्या गाठू शकले नाहीत. अर्शीन कुलकर्णी (३), कर्णधार उदय सहारन (८), मुशीर खान (२२), सचिन धस (९), प्रियांशू मोलिया (९), अरवली अविनाश राव (०), राज लिंबानी (०), सौमी कुमार (२) हे खेळाडू अपयशी ठरले. नमन तिवारी ११ धावांवर नाबाद राहिला. गोलदाजीत ऑस्ट्रेलियाकडून राफेल मॅकमिलन याने ३, मह्ली बीअर्डमनने ३ आणि कॉलम विडलरने २ बळी टीपले.तर, चार्ली अँडरसन आणि टॉम स्ट्रॅकरने प्रत्येकी एका फलंदाजाला बाद केलं.तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ऐतिहासिक कामगिरी केली होती. या स्पर्धेच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या संघाने फायनलमध्ये २५० धावांचा टप्पा ओलांडला. पहिल्या डावात फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाकडून या सामन्यात हरजस सिंगने सर्वाधिक ५५ धावांची खेळी साकारली. ६५ चेंडूत त्याने ३ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने अर्धशतक झळकावलं. त्याचबरोबर स्वतः कर्णधार ह्यू वैबगेन (४८), ऑली पीक नाबाद ४६ आणि सलामीवीर हॅरी डिक्सन याने ४२ धावांची खेळी साकारत ऑस्ट्रेलियाच्या डावाला आकार दिला. गोलंदाजीत भारताकडून राज लिंबानी याने सर्वाधिक ३ बळी घेतले, तर नमन तिवारीने दोन कांगारूंना पव्हेलियनचा रस्ता दाखवला. सौमी कुमार पांडे आणि मुशीर खान या दोघांनी प्रत्येकी एक बळी टीपला.दक्षिण आफ्रिकेत खेळवण्यात आलेल्या यंदाच्या १९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा ७९ धावांनी धुव्वा उडवला आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकांमध्ये ७ बाद २५३ धावा करत भारतासमोर २५४ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ सपशेल अपयशी ठरला. भारताचा युवा संघ निर्धारित ५० षटकंदेखील खेळू शकला नाही. टीम इंडियाला ४३.५ षटकांत अवघ्या १७४ धावांपर्यंत मजल मारता आली. सलामीवीर आदर्श सिंह (४७) आणि खालच्या फळीत मुरुगन अभिषेक (४२) या दोघांनी काही काळ प्रतिकार केला खरा, परंतु, या दोघांना दुसऱ्या कुठल्याच फलंदाजाकडून साथ मिळाली नाही.

### पराभवाचं कारण काय?

दरम्यान, या सामन्यात भारतीय संघाच्या पराभवाबाबत चर्चा सुरू आहे. अशातच भारताचा माजी क्रिकेटपटू आणि या सामन्यात समालोचन करणाऱ्या मोहम्मद कैफने भारताच्या पराभवाचं विश्लेषण केलं आहे. समालोचन करताना कैफ म्हणाला, भारताच्या संघव्यवस्थापनाने या सामन्यात आणखी एक जलदगती गोलंदाजाला संधी द्यायला हवी होती. भारताने पहिल्या डावात गोलंदाजी करताना सुरुवातीच्या २० पैकी ६ षटकं जलदगती गोलंदाजांकरवी खेळवली. तर उर्वरित १४ षटकं फिरकीपटूंनी टाकली. तसेच या सामन्यात भारताकडून सर्वाधिक ३ बळी राजनेच टीपले.

# मॅक्सवेलच्या वादळात विंडीजचा 'पालापाचोळा'

## ऑस्ट्रेलियन अष्टपैलू मॅक्सवेलने 55 चेंडूत 120 धावांचा पाऊस पाडला

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज




**ॲडिलेडमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या टी-20 सामन्यात ग्लेन मॅक्सवेलचे वादळ पाहायला मिळाले. ऑस्ट्रेलियन अष्टपैलू मॅक्सवेलने अवघ्या 55 चेंडूत 120 धावांचा पाऊस पाडला. या खेळीत त्याने 12 चौकार आणि 8 षटकारांची बरसात केली. ग्लेन मॅक्सवेलचे आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यातील हे पाचवे शतक आहे. आंतरराष्ट्रीय टी-20 सामन्यांमध्ये सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत रोहित शर्मासह ग्लेन मॅक्सवेल प्रथम स्थानावर पोहोचला आहे.**

ग्लेन मॅक्सवेल व्यतिरिक्त रोहित शर्माने आंतरराष्ट्रीय टी-20 सामन्यांमध्ये 5 वेळा शतकाचा टप्पा ओलांडला आहे.वेस्ट इंडिजसमोर विजयासाठी 242 धावांचे लक्ष्य असताना त्यांना 20 षटकात 9 बाद 207 धावापर्यंत मजल मारता आली. कॅप्टन रोवमॅन पॉवेलने 36 चेंडूत 63 धावांची खेळी करत संघर्ष केला, पण ठराविक अंतराने विकेट गमावल्याने पराभव पत्करावा लागला. ऑस्ट्रेलियाकडून मार्क स्टॉयनिसने तीन विकेट घेतल्या, हेझलवुड आणि स्पेन्सर जॉन्सनने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.ॲडम झम्पा आणि जेसोन बेहरनडॉर्फने एक विकेट घेतली. रोहित शर्माने 143 सामन्यात 5 शतके झळकावली आहेत. पण ग्लेन मॅक्सवेलने अवघ्या 94 सामन्यात 5 शतके ठोकण्याचा पराक्रम केला. याशिवाय टीम इंडियाचा सूर्यकुमार यादव तिसऱ्या क्रमांकावर आहे. सूर्यकुमार यादवच्या नावावर 57 टी-20 सामन्यांमध्ये 4 शतके आहेत. ॲडलेडमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध ऑस्ट्रेलियाने 20 षटकांत 4 गडी गमावून 241 धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून ग्लेन मॅक्सवेलने शतक झळकावले, पण याशिवाय अन्य कोणत्याही फलंदाजांना चमक दाखवता आली नाही. डेव्हिड वॉर्नर, मिचेल मार्श आणि टीम डेव्हिडसारख्या फलंदाजांनी छोटे पण उपयुक्त योगदान दिले.

### विजयासाठी 242 धावांचे लक्ष्य

ग्लेन मॅक्सवेल व्यतिरिक्त रोहित शर्माने आंतरराष्ट्रीय टी-20 सामन्यांमध्ये 5 वेळा शतकाचा टप्पा ओलांडला आहे.वेस्ट इंडिजसमोर विजयासाठी 242 धावांचे लक्ष्य असताना त्यांना 20 षटकात 9 बाद 207 धावापर्यंत मजल मारता आली. कॅप्टन रोवमॅन पॉवेलने 36 चेंडूत 63 धावांची खेळी करत संघर्ष केला, पण ठराविक अंतराने विकेट गमावल्याने पराभव पत्करावा लागला.हेझलवुड आणि स्पेन्सर जॉन्सनने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. ॲडम झम्पा आणि जेसोन बेहरनडॉर्फने एक विकेट घेतली. पण ग्लेन सूर्यकुमार यादवच्या नावावर 57 टी-20 सामन्यांमध्ये 4 शतके आहेत.ॲडलेडमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध ऑस्ट्रेलियाने 20 षटकांत 4 गडी गमावून 241 धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून ग्लेन मॅक्सवेलने शतक झळकावले.